सकाळ

बुधवार, २५ एप्रिल २०१८ | ७

# उन्हाळी शिबिर घुले विद्यालयात उत्साहात



मांजरी : पंख संस्थेतर्फे के. के. घुले विद्यालयात उन्हाळी प्रशिक्षण शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थिनी.

हडपसरता. २४ : क्विकहिल फाउंडेशन व पंख संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने शाळांगण प्रकल्पांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या के. के. घुले विद्यालयात एकदिवसीय उन्हाळी शिबिर उत्साहात झाले. शिबिरांतर्गत मानसशास्त्रज्ञ आनंद गोडसे यांनी आफ्रिकन वाद्य जेम्बे हे वेगवेगळ्या तालात कसे वाजवावे हे शिकविले. त्याचबरोबर या ज़ेम्बे वाद्याच्या माध्यमातून त्यांनी ताणतणाव व्यवस्थापन, गट कार्य व रागावरील नियंत्रण या गोष्टींदेखील खूप सुंदररीत्या कळत नकळतपणे शिकविल्या.

योगेश डोंगरे यांनी मुलांना संस्कार भारतीची रांगोळी अत्यंत सोप्या पद्धतीने शिकविली व रांगोळीमध्ये रंगांच्या अनेकविध छटा कशा वापराव्यात हे शिकविताना नकळतपणे मुलींवर कलेचे संस्कार घडविले. मुला-मुलींमधील सुप्त कला गुण शोधणे हा शिबिराचा मुख्य हेतू होता. जेम्बे वाद्य वाजविताना आमच्यातील दमन झालेल्या रागाचे शमन झाले, तर काहीतरी वेगळे शिकल्याचे समाधान मिळाले, तसेच रांगोळी काढताना आपणही सुंदर रांगोळी काढू शकतो हा शोध लागला, अशा भरभरून प्रतिक्रिया मुलांनी दिल्या.

पंख संस्थेच्या प्रमुख स्मिता आपटे यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करून दिली. क्विकहिल फाउंडेशन सीएसआरप्रमुख अजय शिर्के यांनी मुलांना रंगोळीतील रंग व आपल्या आयुष्यातील वेगवेगळे चढउतार हे जणू काही रगांप्रमाणेच आहेत, असा रंगोळीतील रंगांचा व आपल्या आयुष्यातील रंगांचा परस्पर संबंध लावत गटकार्याचेदेखील महत्त्व सांगितले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांचा सत्कार झाला. घुले विद्यालयाचे मुख्याध्यापक गोसावी व सचिन भापकर यांनी प्रास्ताविक व अभार मानले.